अभियानांतर्गत नियमभंग करणाऱ्या अनेक आस्थापनांचे परवाने थेट निलंबित करण्यासह अनेक आस्थापनांवर दंडात्मक कारवाईही केली आहे. यातून तब्बल दोन कोटी तेरा लाख रुपयांचा महसूल शासनाला प्राप्त झाली आहे, अशी माहिती अन्न व औषध प्रशासनाच्या पुणे विभागाचे सहआयुक्त दिगंबर भोगावडे यांनी दिली.

धनकवडीतील एका कार्यक्रमात ते रोखण्यासाठी केवळ कारवाई पुरेशी नसून व्यापक जनजागृती हीच सर्वात प्रभावी उपाययोजना असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. ?

ग्राहकांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी प्रशासन अधिक आक्रमक पवित्रा घेणार असून, प्रत्येक अन्न व्यवसायिकाने स्वच्छता आणि अन्न सुरक्षेच्या नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

हडपसर : पुणे शहरातील पहिला इलेक्ट्रिक बस डेपो म्हणून ओळख असलेल्या भेकराईनगर येथील पीएमपीएमएलच्या डेपोच्या प्रवेशद्वाराची अत्यंत दुरवस्था झाली आहे. प्रवेशमार्गावरच मोठा खड्डा पडल्याने इलेक्ट्रिक बसचालकांसह प्रवाशांनाही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अगदी प्रवेशद्वारातच पडलेल्या मोठ्या खड्ड्यामुळे डेपोत येणाऱ्या नागरिकांना मोठी कसरत करावी लागत आहे.

**बसचालकांसह प्रवाशीही त्रस्त; रस्ता दुरुस्त करण्याची मागणी**

भेकराईतील या डेपोमध्ये बस प्रवेश करताना आणि बाहेर पडताना प्रवेशद्वारावरील मोठ्या खड्ड्यांमुळे बसला जोरदार हादरे घेत आहेत. विशेषतः इलेक्ट्रिक बसच्या मागील भागाला मोठा धक्का बसत असल्याने वाहनांच्या तांत्रिक यंत्रणांवर त्याचा विपरीत

# विठ्ठलराव शिवरकर विद्यालयात सायबर सुरक्षेबाबत जनजागृती

लोकमत न्यूज नेटवर्क

**वानवडी :** वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी अण्णासाहेब मगर महाविद्यालय आणि क्विक हील फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या 'सायबर शिक्षण फॉर सायबर सुरक्षा २०२६' अभियानांतर्गत विठ्ठलराव शिवरकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, वानवडी येथे सायबर जनजागृती सत्र उत्साहात पार पडले.

ग्रुप ६ मधील सायबर वॉरियर्स काजल लवांडे, पायल इंगोले तसेच ग्रुप ९ मधील श्रावणी जगताप व मिनाज नदाफ यांनी विद्यार्थ्यांना ऑनलाइन फसवणूक, मजबूत पासवर्डचे महत्त्व, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, डिजिटल गोपनीयता, ओटीपी फसवणूक, सायबर बुलिंग आणि सुरक्षित इंटरनेट वापर याविषयी मार्गदर्शन केले. सायबर गुन्ह्यांपासून बचावाचे उपाय समजावून सांगण्यात आले. या उपक्रमासाठी प्राचार्य लहू वाघुले यांचे सहकार्य लाभले. अण्णासाहेब मगर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे, उपप्राचार्य डॉ. प्रशांत मुळे, उपप्राचार्या डॉ. शुभांगी औटी, संगणकशास्त्र विभागप्रमुख प्रा. विलास वाणी तसेच प्रा. मनीषा गाडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला.

मस्ट READ

## आंबेगावमध्ये छत्री पेंटिंग व कॅलिग्राफी